# सरत्या वर्षाला उजाळा....



**वर्धा :** कारंजा -तालुक्यातील एनगाव येथील जलादेवी मंदिरात लाडकी बहीण योजनेच्या प्रचार व प्रसार संवाद बैठक माहे ५ ऑक्टोबर रोजी आयोजित होती, अचानक वादळी पावसाने थैमान घातल्यामुळे मंदिराच्या चारही बाजुला पुराने वेढा घातला असता जलादेवी मंदिरात उपस्थित असलेले कार्यकर्ते महिला व जेष्ठ नागरिकांसह लहानग्यांना पुरातुन शर्थीचे प्रयत्न करताना तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक तथा विद्यमान आमदार सुमित वानखेडे यांनी जीवाची पर्वा न करता मदत केली तो प्रसंग स्मरणार्थ

## रहमान साहेब मिनी मंत्रालयात चालले तरी काय ?

# बांधकाम विभागात अभियंता म्हणून रुजू होताच गुंडतवारांचे अर्थपूर्ण व्यवहार सुरु



मुकाअ जितीन रहमान



अति मुकाअ सुरज गोहाड



मुख्य लेखाधिकारी मनोज पाते



कार्य अभियंता शुभम गुंडतवार

**नरेंद्र देशमुख**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

ग्रामीण भागाचा कणा असलेल्या स्वायत्त संस्था म्हणून जिल्हा परिषदेकडे मिनीमंत्रालयाचा दर्जा असल्याचा लाभ पदाधिकारी नसल्याने विभाग प्रमुख जणूकाही सैरावैरा सुटले की काय असा प्रश्न बांधकाम विभागात प्रतिनिधीने फेरफटका मारला असता दिसुन आला. कार्यकारी अभियंता म्हणून शुभम गुंडतवार रुजू होताच अतिरिक्त मुकाअ सुरज गोहाड यांच्या सहाय्याने नियमाला बगल देत अर्थपूर्ण व्यवहार सुरु झाल्याचे दृष्टिक्षेपात आले.

जिल्हा परिषदेत प्रशासकीय राज असल्याचा थाट जणू काही विभाग प्रमुखांच्या अंगवळणी पडला की काय जो तो मनमुराद कार्य करण्यास तत्पर दिसुन येत असल्याचा प्रत्यय बांधकाम विभागातील सुशिक्षित बेरोजगार व लहान कंत्राटदारांची प्रतिनिधीने भेट घेताच आला. शुभम गुंडतवारच्या कुंडल्यांची रिघ लागल्याचे नमुने हाती आले आहे.

जि.प.बांधकाम विभागात नव्यानेच रुजू झालेले कार्यकारी अभियंता शुभम यांचेवर पिताश्री खुशाल गुंडतवार येथीलच आरोग्य विभागात वरिष्ठ पदावरुन सेवानिवृत्त झाल्याने त्यांना जि.प.च्या प्रत्येक कोप-यात वावरण्याचा सहवास लाभला. समुद्रपूर येथे उपअभियंतापदावर कार्यरत असताना लक्ष्मी पदरात पाडून निविदा कामातील अनियमितता मॅनेज करण्याचा हातखंडा असल्याने समुद्रपूर येथून थेट जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता म्हणून रुजू होण्याकरिता आमदार व पक्षीय नेत्यांची मनधरणी करीत आर्थिक लाभाचे आश्वासन देत पदरी विभाग प्रमुखाची जबाबदारी गिळंकृत केली. तेव्हापासुनच येथील कार्यरत अतिरिक्त मुकाअ सुरज गोहाड यांना हाताशी घेत निविदांना प्रशासकीय मंजूरी मिळण्यापूर्वीच लाभाच्या कंत्राटदाराशी हातमिळवणी करीत सुशिक्षित बेरोजगार व लहान कंत्राटदारांना अडचणीत आणले, हे विशेष. ५० लाखाची मर्यादा असलेल्या कंत्राटदारास नियमबाह्यपणे शासनाने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा (५० लाखांपेक्षा )अधिकची कामे देण्याचा घाट रचल्याने सुशिचित बेरोजगार अभियंता व लहान कंत्राटदार अडचणीत सापडला. शुभम रुजू झाला तेव्हापासूनच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय करण्यास अति. मुकाअ. गोहाड व नवनियुक्त मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी मनोज पाते यांचीही साथ मिळविली. या त्रिकुटाने **हम करे सो कायदा** ही बिरुदावली जिल्हा परिषदेत रुजविल्याने येथे मुख्य कार्यकारी अधिकारी आहे की नाही असाच प्रत्यय कंत्राटदारांना येवू लागला. आपला कोणी वालीच नसल्याचे कंत्राटदाराने प्रतिनिधीशी बोलताना मत व्यक्त केले.

विधानसभा निवडणुकीपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या संभाव्य कामाच्या यादीची प्रशासकीय मान्यता मिळण्यापूर्वीच निविदा समितीच्या सदस्यांना अर्थपूर्ण लालचेपोटी व समुद्रपूर ते वर्धा या प्रवासात ज्यांचा आशिर्वाद लाभला त्यांना परतफेड म्हणून समितीच्या सदस्यांवर दबावतंत्राचा अवलंब करीत ई-निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द केली होती. परंतु कर्तव्यदक्ष तत्कालीन माजी राज्यमंत्री रणजित कांबळे यांनी नियोजन समितीची बैठक न होता तसेच प्रशासकीय मान्यतेपुर्वीच

### रात्रीतून चाले जि. प. च्या निविदांचा कारभार

ई-निविदा कशी काय प्रकाशित केली याबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांची कानउघडणी केल्याने कर्तव्यदक्ष अधिकारी कर्डिले यांनी त्या सर्व कामांना स्थगिती दिली.

ई-निविदा मंजुरीपूर्वी प्रसिध्दी केल्याने कामकाजात व्यत्यय निर्माण तर झालाच परंतु त्यांचेवर शासकीय कामात नियमबाह्य कामांना मंजुरी देत आर्थिक उलाढाल केल्याने शुभम गुंडतवार यांचेवर तत्कालीन जिल्हाधिका-यांनी फौजदारी गुन्हाच दाखल करणे आवश्यक होते. याहीशिवाय त्यांचेवर निलंबनाची कारवाई करणे क्रमप्राप्त असताना शुभमने आमदारांचा दबाव आणून प्रकरण दडपले. शुभम गुंडतवार यांनी या कामी सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी आपले पिताश्री खुशालराव यांचाही सहभाग घेतल्याचे बोलले जाते. शेवटी या इतिवृत्तावरुन एवढेच म्हणावे लागेल रहमान साहेब मिनी मंत्रालयात चालले तरी काय! **(क्रमश....)**

## स्व. मा. सां. कन्नमवार यांची १२५ वी जयंतीचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री स्व. मा. सां. उपाख्य दादासाहेब कन्नमवार यांची १२५ वी जयंती समारंभ मातोश्री सेलीब्रेशन हॉल, माऊली पार्क, येथे दि. १० जानेवारील आयोजीत करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. अजय गिंदेवार यांचे हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा. गड्डवार, श्रीमती. अंगावार, कोलावार उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख अतिथींच्या हस्ते वेलदार समाजातील गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार तसेच विविध सांस्कृतीक कार्यक्रम तसेच रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बेलदार समाज संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

# एसटीच्या धडकेत वृध्द महीला जागीच ठार



**महासागर प्रतिनिधी**
**कारंजा (घा), दि. ०८ जानेवारी**

तालुक्यातील भालेवाडी येथे नेहमीप्रमाणे आज बुधवारला सकाळी ६.३० वाजता सुमारास एस.टी.बस गावात आली .गावातील चौकात .एम.एच. ०७ सी. ९०७३ क्रमांकाची बस आली असता एस.टी. जवळ उभी असलेली वृद्ध महिला चालकाच्या डाव्या भागाच्या समोरील चाकाखाली आल्याने वृद्ध महिलेचा जागीच मृत्यु झाला. कमला किसना दुपारे वय(७०) रा. भालेवाडी असे मृतक वृध्देचे नाव आहे.

चालक सरजेराव मानगिर रा. कारंजा यांच्या निष्काळजीपणामुळे मृतक कमला दुपारे यांना एस. टी. ची धडक लागली.

यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे गावातील मुख्य चौकात काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती. प्रवाश्यांना घेण्याकरीता ही एस टी बस गावात आली होती. बसने जाण्याकरीता मृतक वृध्द महिला चौकातील बसकडे गेली होती तेव्हा हा अपघात झाला. चालकाच्या डाव्या भागाच्या समोरील चाकाखाली ही महिला आल्याने वृद्ध महिलेचा जागीच मृत्यु झाला. याप्रकरणी एस. टी. च्या चालकाविरुद्ध पो.स्टेला गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# नाफेड मार्फत जिल्ह्यात आता पर्यंत ७६२१३.७६ क्विंटल सोयाबिन खरेदी

**▫सोयाबिन खरेदीसाठी ९००४ शेतक-यांनी केली नोंदणी ▫ ३ हजार ८१५ शेतक-यांकडून सोयाबिनची खरेदी**

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत जिल्ह्यात नाफेड मार्फत दि.१५ ऑक्टोंबर २०२४ पासुन सोयाबिन खरेदी करण्यास सुरवात करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसात शेतकरी नोंदणी व खरेदीच्या प्रक्रियेत वाढ झालेली आहे. आज पर्यंत जिल्ह्यात ७६ हजार २१३.७६ क्विंटल सोयाबिन खरेदी करण्यात आली असून ३ हजार ८१५ शेतक-यांनी आधारभूत सोयाबिन खरेदी योजनेचा लाभ घेतला असल्याचे जिल्हा पणन अधिकारी बि.वाय. शेख यांनी सांगितले.

उर्वरीत अंदाजे १ लाख क्विंटल सोयाबिन खरेदी होण्याची अपेक्षित असल्याने जिल्ह्यात सध्या बारदानाचा तुटवडा असल्यामुळे मुबंई येथील मुख्य कार्यालयास २ लाख बारदान्याची मागणी नोंदविण्यात आली असून नविन बारदाना ३ ते ४ दिवसात उपलब्ध होणार असून बारदान प्राप्त होताच सोयाबिन खरेदी प्रक्रिया सुरु होणार असल्याचेही शेख यांनी सांगितले.

जिल्ह्यातील वर्धा येथील केंद्रावर १ हजार ५४९ शेतक-यांनी नोंदणी केली असून ६४७ शेतक-यांकडून १३ हजार २७०.९ क्विंटल करण्यात आली आहे. देवळी येथे १ हजार २७३ शेतक-यांनी नोंदणी केली असून ५०२ शेतक-यांकडून ९ हजार ४०२.१ क्विंटल, पुलगाव येथे ६०३ शेतकरी नोंदणी, २१३ शेतक-यांकडून ३ हजार ७६३.४ क्विंटल खरेदी, कारंजा २६५ शेतकरी नोंदणी २१ शेतक-यांकडून ३३६.१ क्विंटल खरेदी, आष्टी येथे ७१३ शेतकरी नोंदणी २५८ शेतक-यांकडून ४ हजार ५३७.५ क्विटल खरेदी, हिंगणघाट येथे १ हजार ७९१ शेतकरी नोंदणी ९७४ शेतक-यांकडून १८ हजार ७५८.९ क्विंटल खरेदी, समुद्रपूर येथे १ हजार २३१ शेतकरी नोंदणी ५४५ शेतक-यांकडून ११ हजार ८३०.२ क्विंटल खरेदी, जाम येथे १ हजार ५७९ शेतकरी नोंदणी ६५५ शेतक-यांकडून १४ हजार ३१४.७ क्विंटल खरेदी करण्यात आली असून जिल्ह्यातील आठही खरेदी केंद्रावर एकुण ९ हजार ४ शेतक-यांची नोंदणी झाली असून ३ हजार ८१५ शेतक-यांकडून ७६ हजार २१३.७६ क्विंटल सोयाबिन खरेदी करण्यात आली असल्याचे जिल्हा पणन अधिकारी यांनी परिपत्रकाव्दारे कळविले आहे.

## जुन्या वादातून अमानुष मारहाण

**वर्धा :** जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठीकरण्यात आली, हीघटना ५ जानेवारीला देवळी तालुक्यातील गिरोली येथे घडली, याप्रकरणी नारायण डमरु आखतकर (७२) यांच्या तक्रारीवरुन विजय लोहवे रा. गिरोली यांच्याविरुद्ध देवळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, या प्रकरणी देवळी पोलीसांनी गुन्हयाची नोंद केली असून तपास सुरु आहे.

# युथ फेस्टला आजपासून सुरुवात

## राज्य मंत्री डॉ. भोयर यांच्या हस्ते उत्सवाचा शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या हक्काचा मंच मिळवून देणारा बहुचर्चीय उत्सव म्हणजे वर्धा युथ फेस्ट चरखा गृह येथे सुरू होत आहे.वर्धा जिल्ह्यातील युवकांकरिता विविध क्षेत्रात समाजकार्य करणाऱ्या युवा संस्थांच्या एकत्रा करणातून युथ फेस्टिवल कमिटीच्यावतीनेयुथ फेस्ट २०२५ चेआयोजनवर्धेतीलचरखा गृह येथे करण्यात येत आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन वर्धा जिल्ह्यातील युवकांना नव्या जगाची ओळख करून देण्यासाठी तसेच नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळवून देण्यासाठी विविध पद्धतीचे कार्यक्रम आयोजित करीत आहे.

या तीन दिवसीय कार्यक्रमा मध्ये युवकांमधील सुप्त गुणांना वाव मिळण्याकरिता विविध उपक्रम आयोजित करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये पहिल्या दिवशी सकाळी उद्घाटन समारोहानंतर लगेचच डी.आर.डी.ओ. च्या नामवंत वैज्ञानिकांचे मार्गदर्शन, . त्याचबरोबर याच दिवशी सायंकाळी, वर्धेतील युवकांचे युथ पार्लमेंट चे आयोजन करण्यात आलेले आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी महाराष्ट्रातील उद्योजक व उद्योग सल्लागार यांचे मार्गदर्शन व नवीन उद्योग सुरू करण्यासाठी महत्त्वाच्या बाबी युवकांना शिकविल्या जाणार आहेत. याच दिवशी सायंकाळी वर्धेतील नाविन्यपूर्ण कला संगम कार्यक्रम 'वर्धाज गॉट टॅलेंट' चे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये वर्धेतील संपूर्ण युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद युथ फेस्टिवलला मिळाला असल्याचे समिती चे अध्यक्ष सारंग रघाटाटे यांनी सांगितले.याचबरोबर तिसऱ्या दिवशी भारतीय सैन्य दलाचे महाराष्ट्राचे निवड अधिकारी यांचे भारतीय सैन्यांमध्ये निवड प्रक्रिया कशाप्रकारे पार करायची, या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच संपूर्ण वर्धेतील युवकांचा आवडीचा उत्सव उत्सवाचा कार्यक्रम म्हणजे साऊंड फेस्ट युवकांकरिता आयोजीत करण्यात येत आहे वर्धेतील युवकांच्या सुप्त गुणांना वाव देण्याबरोबरच त्यांना कारकिर्दीच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे याकरिता वर्धा जिल्ह्यातील संपूर्ण युवकांनी तसेच नागरिकांनी युवकांच्या या विशेष कार्यक्रमाचे कौतुक करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन संपूर्ण वर्धा युथ फेस्टिवल कमिटीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

### मदनी येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**कारंजा (घा), , दि. ०८ जानेवारी**

वेडसरपणाच्या भरात युवकाने स्वतःच लाकडी मयालीला दोरी बांधून गळफास लावून घेत आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील मदनी शिवारात ७ जानेवारीला सायंकाळच्यां सुमारास उघडकीस आली. रोशन मदन भुयार वय (३६) रा. मदनी असे मृतकाचे नाव आहे. यासंदर्भात मृतकाचा चुलत भाऊ रुपेश भुयार याने कारंजा पोलिसांना माहिती दिली.

सविस्तर वृत्त असे की, मृतकाची आई जेव्हा शेतातून मी घरी परत आली. त्यावेळी घराचा दरवाजा आतमधून लावून होता. अशावेळी मृतकाची आई दार उघडून आतमध्ये गेली असताना रोशन भुयार याने घरातील छपरीत लाकडी मयालीला दोरी बांधून फाशी घेऊन आत्महत्या केल्याची दिसून आले. मृतक पंधरा ते वीस वर्षापासून वेडसर असल्याने खासगी व सरकारी दवाखान्यात त्याचे उपचार सुरू होते. प्रकृतीमध्ये सुधारणा झाली नाही वेड सरपण्याच्याभरात घरी कोणी नसताना लाकडी मयालीला दोरी बांधून त्याने फाशी घेतली. पंचनामा करून ग्रामीण रुग्णालय येथे शवविचेदन करण्यात आले. कारंजा पोलीसात मृत्यूची नोंद करण्यात आली.

## देवळी येथे शेतीच्या कारणावरुन मारहाण

**वर्धा :** शेतीच्या कारणावरुन वाद करुन मारहाण करण्यात आली, हीघटना देवळीच्या देशमुखपुरा परिसरात घडली, संबंधित प्रकरणी प्रेरणा प्रशांत खंडार रा. देवळी यांनी देवळी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविलीआहे, संबंधितप्रकरणीतक्रारीवरुन जगदीश मोहीत सुभाष, सतीश सर्व रा. देवळी यांनी देवळी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविलीआहे, संबंधितप्रकरणीतक्रारीवरुन जगदीश, मोहीत, सुभाष, सतीश सर्व रा. देवळीयांच्याविरुद्ध गुन्हादाखलकरण्यात आला आहे, तर या प्रकरणीचंद्रभान यांच्या तक्रारीवरुन रवी खंडाळे, अजय खंडाळे, प्रशांत खंडाळेसर्वरा. देवळीयांच्याविरुद्ध देवळी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा







**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

पोलीस प्रदर्शनीमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी व नागरीकांनी घेतला सहभाग वर्धा जिल्हा पोलीस दलातर्फे महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने पोलीस विभागामार्फत विद्यार्थ्यांना व नागरीकांना दैनंदिन पोलीस कामकाजाची माहिती व्हावी याकरीता पोलीस मुख्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोलीस प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.

दोन दिवसीय प्रदर्शनीमध्ये संपुर्ण वर्धा जिल्ह्यातील ५२ शाळा व महाविद्यालय येथुन ७ते ८हजार विद्यार्थी व नागरीकांकडुन सहभाग घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांना व नागरीकांना दैनंदिन पोलीस कामकाजाची माहिती व्हावी याकरीता सायबर जनजागृती व साक्षरता, वाहतून नियमन व रस्ते सुरक्षा, शस्त्र प्रदर्शनी, मॉडेल पोलीस स्टेशन, बॉम्ब स्कॉड, डॉग स्कॉड, बिनतारी संदेश वहन, महिला सुरक्षा, डायल ११२, चाईल्ड हेल्प लाईन १०९८, अंमली पदार्थाचे दुष्परिणाम, फॉरेन्सीक व्हॅन व टुल किट्स, क्यूआरटी, आरसीपी गृहरक्षक दल आदी स्टॉल लावुन त्यांचे कर्तव्य व कामकाजा बाबत माहिती देण्यात आली.

आपतकालीन परस्थितीमध्ये (दंगा काबु करणे, बॉम्ब डिस्पोज करणे, पोलीस श्वॉनचे काम, व्हि.आय.पी. बंदोबस्त) यामध्ये पोलीसांची भुमीका काय असते तसेच क्यूआरटी, आरसीपी यांचे प्रात्यक्षीक विद्यार्थी व नागरीकांना देण्यात आले. विद्यार्थ्यांकरीता प्रश्न मंजुषाचा कार्यक्रम आयोजित करुन सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनी विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परीक्षेत्र नागपूर दिलीप पाटील भुजबळ, पोलीस अधीक्षक अनुराग जैन, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, उपवन संरक्षण अधिकारी हरविर सिंग, उपजिल्हाधिकारी प्रियंका पवार , जिल्हा शल्य चिकीत्सक सुमंत वाघ, यांचे प्रत्यक्ष हजेरीत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

### २०२ मोबाईल ट्रेस करण्यात यश

मागील दोन महिन्यात सायबर सेल वर्धा येथे ६३२ मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यावरून सायबर सेल वर्धा यांनी पथक परिश्रम करून एकूण २०२ मोबाईल ट्रेस करण्यात यश मिळविले. त्यापैकी ७१ मोबाईल रिकव्हर करून पोलीस प्रदर्शित त्यांनी दरम्यान मान्यवरांच्या हस्ते हरविलेल्या मोबाईलचे मूळ मालकांना त्यांचे हरवलेले मोबाईल परत करण्यात आले

# झडशी परिसरात बिबट्या मृतावस्थेत आढळल्याने खळबळ



**महासागर प्रतिनिधी**
**सेलू, दि. ०८ जानेवारी**

तालुक्यातील झडशी सहवन क्षेत्रातील चारगाव शिवारात आज मादी बिबट मृतावस्थेत आढळून आल्याची घटना उघडकीस आली . याप्रकरणी घातपाताची शंका व्यक्त केली जात असून वनविभागाचे अधिकारी अलर्ट मोडवर असल्याचे सांगितले जाते.

झडशी सहवन क्षेत्रातील मौजा चारगांव शिवारात आज सकाळी नऊ वाजताच्या सुमारास बिबट्या मृतावस्थेत आढळल्याची माहिती वनविभागाला मिळाली. मौजा चारगांव शिवारातील मेशरे नामक शेतकऱ्याच्या शेताजवळील पडतात सदर बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. यासंदर्भात माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी मादी बिबट्या मृतावस्थेत पडून होता. सदर घटनास्थळी वनविभागाचे आरएफओ खेडकर, झडशी

### घातपाताची शंका..!

सहवनाचे क्षेत्र सहाय्यक जी जी टाक, वनरक्षक ए एस मौजान, एस एच भोईटे, ए एम ढाले, जी एस महागडे, बिटरक्षक एम एम कुकडे यांनी भेट देऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मोक्का चौकशी पंचनामा केला. दरम्यान मादी बिबट्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला किंवा घातपात घडवून आणला यासंदर्भातील माहिती शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होईल, अशी माहिती वनविभागाकडून देण्यात आली.

## देवळी येथे शेतीच्या कारणावरुन मारहाण

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

शेतीच्या कारणावरुन वाद करुन मारहाण करण्यात आली, ही घटना देवळीच्या देशमुखपुरा परिसरात घडली, संबंधित प्रकरणी प्रेरणा प्रशांत खंडार रा. देवळी यांनी देवळी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, संबंधित प्रकरणी तक्रारीवरुन जगदीश मोहीत सुभाष, सतीश सर्व रा. देवळी यांनी देवळी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, संबंधित प्रकरणी तक्रारीवरुन जगदीश, मोहीत, सुभाष, सतीश सर्व रा. देवळी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर या प्रकरणी चंद्रभान यांच्या तक्रारीवरुन रवी खंडाळे, अजय खंडाळे, प्रशांत खंडाळे सर्व रा. देवळी यांच्याविरुद्ध देवळी ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हिंगणघाट - नंदोरी रस्ता बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

### राकाँ शरदपवार गट आक्रमक



**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघाट, दि. ०८ जानेवारी**

राय महामार्ग ३२२ हिंगणघाट ते नंदोरी हायवेवर आठ दिवसात बांधलेल्या रस्त्याला भेगा पडल्यामुळे बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाम अधिका-यांना निवेदनाद्वारे केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग ३२२ हिंगणघाट - नंदोरी हायवेचे काम मागील सहा महिन्यापासून सुरु आहे. या हायवेचे बाधकाम सुरु असून बांधकाम झालेल्या ठिकाणावर अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहे. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. किरकोळ अपघात नित्याचीच बाब झाली आहे. १५ दिवसांपूर्वी याच रोडव अशोक बोरकर यांचा अपघात होवून मृत्यू देखील झाला आहे. होऊन परिसरात राहणाऱ्या नागरिकांना या रोडच्या मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. नुकत्याच झालेल्या कामाला अल्पावधीतच अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहे. त्यामुळे या रोडच्या कामांत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असुन त्यामुळे या महामार्गाचे कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी.अशी ओरड नागरिक करीत आहे.

नंदोरी रोडच्या आजूबाजूला अनेक वर्षापासून झाडे लावण्यात आली होती. त्याचे संगोपन देखील वृक्षमित्र करीत होते. रोडच्या कामामुळे ती झाडे तोडण्यात आली. त्यामुळे झाडे तोडणा-यावर कारवाई करण्यात यावी.तसेच शहरातील मोठा दळणवळीचा मार्ग फिदा हुसेन पेट्रोल पंप ते विठोबा चौक पर्यंत रोडचे नुकतेच एक वर्षा आधी बांधकाम झाले असून यारस्त्याला अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहे. यामुळे या रोडवरती अपघाताचे प्रमाण वाढले आहे. तसेच रोडच्या मधोमध गट्टू लावण्यात आले आहे. ते गट्टू देखील निघत आहे. या सर्व कामाची चौकशी करून कारवाई करावी.अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी यांना निवेदन दिले आहे. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांचे शहाराध्यक्ष बालू वानखेडे, समाजसेवक सुनील डोंगरे, विधानसभा बूथ अध्यक्ष अमोल बोरकर, सुनील भुते, पंकज भट्ट, आकाश हुरले,निखिल ठाकरे आदी उपस्थित होते.

## शहरात पंचशील ध्वज दिवस साजरा




**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

बौद्ध धम्म ध्वज पहिल्यांदा २८ मे १८८५ रोजी वैशाख पौर्णिमेच्या म्हणजे बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सार्वजनिकरित्या फडकवण्यात आला. १९५२ मध्ये बौद्ध ग्लोबल कौन्सिलमध्ये आंतरराष्ट्रीय बौद्ध ध्वज म्हणून या ध्वजाला मान्यता देण्यात आली. दर वर्षी ८ जानेवारी हा दिवस धम्म ध्वज, पंचशील ध्वज दिवस म्हणून साजरा केला जातो.

या ध्वजामध्ये क्रमाने निळा, पिवळा, लाल, पांढरा आणि केशरी अश्या रंगांचा समावेश होतो. काही देशांमध्ये केशरी रंगाच्या ठिकाणी गुलाबी आदी रंगाचा उपयोग केला जातो.

शहरातील सिव्हिल लाईन परिसरात असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पंचशिल ध्वज फडकवला तसेच धम्म ध्वजाला मानवंदना दिली. यावेळी भीम टायगर सेना जिल्हाध्यक्ष विशाल रामटेके, पराग धवन, वसंता भगत, सोनू कांबळे, पंकज लभाणे, गोलू हाडके, रोहित यादव,सुरज बडगे,सुरज दुपारे, अमित नाईक, विकास जंजाळ, सुभाष थुल, अमरदिप कांबळे, संजोग मेश्राम आदी बौद्ध अनुयायी उपस्थित होते.

## विधी शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक : प्रो. तिवारी

### विधी विभागात विशेष व्याख्यान आयोजित




**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या विधी विभागातर्फे सोमवार, ०६ जानेवारी रोजी कायदा आणि तंत्रज्ञान या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. या विषयावर प्रकाश टाकताना प्रो. जनार्दन कुमार तिवारी म्हणाले की सध्याच्या काळात तंत्रज्ञानाचे आपल्या जीवनात महत्त्वाचे योगदान आहे. विधी शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे असे ते म्हणाले.

विशिष्ट वक्ता म्हणून इन्स्टिट्यूट ऑफ लीगल स्टडीज, जेएलए, विश्वविद्यालय, मथुरा येथील प्रोफेसर ओंकार नाथ तिवारी म्हणाले की आपल्या जीवनात तंत्रज्ञानाचा हस्तक्षेप वाढत आहे. करार, गुन्हे आणि खटल्यातील पुराव्याच्या बाबतीत तंत्रज्ञानाचे मानवी जीवनात महत्त्वाचे योगदान वाढत आहे, त्यामुळे मानवजातीला फायदा होत आहे, यावरही त्यांनी आपले मत मांडले.

कार्यक्रमाची सुरवात कुलगीताने झाली. प्रो. ओंकार नाथ तिवारी यांचे स्वागत कार्यक्रमाचे संयोजक विधी विभागाचे अधिष्ठाता प्रो. जनार्दन कुमार तिवारी यांनी केले. डॉ. दिव्या शुक्ला यांनी संचालन केले तर डॉ. परमानंद राठोड यांनी आभार मानले. यावेळी आनंद भारती यांच्यासह विद्यार्थी, जयश्री डफरे, अमोल आडे, विक्की लांडे उपस्थित होते.

## परीक्षा केंद्र परीसरात कलम १६३ जारी

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालय उच्चतर शिक्षा विभागाच्यावतीने युजीसी नेट २०२४ च्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षेचे वेळोपत्रकानुसार दि.१६ जानेवारी पर्यंत जिल्ह्यातील अभियांत्रिकी ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अॅन्ड रिसर्च डियु सालोड हिरापूर, स्कुल ऑफ स्कालर्स सावंगी मेघे या परीक्षा केंद्रावर आयोजन करण्यात आले आहे. सदर परीक्षा केंद्राचे १०० मीटर परीसरात जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी आदेश निर्गमित करुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ जारी केली आहे. या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

उच्चतर शिक्षा विभागाच्यावतीने आयोजित युजीसी नेट परीक्षांचे संचालन सुयोग्य प्रकारे व्हावे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ जारी करण्यात आले आहे. सदर कलम अंतर्गत दि.१६ जानेवारी २०२५ पर्यत परीक्षेच्या सकाळी ६ ते सायंकाळी ७ वाजेपर्यत परीक्षा केंद्र परीसरात १०० मीटर परीसरात दोन अथवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या जमावावर आणि सदर परीक्षा केंद्राचे परीसरात झेरॉक्स, मोबाईल, एसटीडी, आयएसडी, फॅक्स, संगणक, ई-मेल, इंटरनेट इत्यादी ईलेक्ट्रॉनिक्स उपकरणे व ईलेक्ट्रॉनिक्स सुविधांचे वापरावर व परीक्षा केंद्र जवळील १०० मीटर परीसरातील असे केंद्र सुरु ठेवण्यावर निर्बंध व प्रतिबंध राहणार आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश परिक्षेकरीता नियुक्त अधिकारी, कर्मचारी, पर्यवेक्षक, पोलीस अधिकारी, कर्मचारी व परीक्षेशी निगडीत अधिकारी व कर्मचारी आणि परीक्षार्थी यांना लागू असणार नाही. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### जुन्या वादातून वयोवृध्दास धारदार वस्तूने केली मारहाण

**वर्धा :** जुन्या वादाच्या कारणातून वयोवृद्धास धारदार वस्तूने मारहाण करीत जखमी केले, ही घटना गिरोली गावात घडली, याप्रकरणी देवळी पोलिसात ५ रोजी तक्रार दाखल करण्यात आली,

नारायण डमरु आखतकर (वय ७२) यांचा नातू शुभम यांचे सात वर्षापुर्वी शेजारी राहणारे विजय लोहवे यांच्याशी वाद झाला होता, नारायण हे घरासमोर उभे असताना विजय लोहवे याने विनाकारण शिवीगाळ करुन वाद केला, नारायणने विजय लोहवे याला हटकले असता विजयने नारायणला ढकलत नेत कोणत्यातरी वस्तूने मारहाण जखमी केले, याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल केला.

## रस्ता सुरक्षा अभियानातंर्गत नेत्र तपासणी व रक्तदान शिबिर

### ९७ नागरिकांची नेत्र तपासणी तर ४० जणांनी केले रक्तदान



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व रक्तदान शिबिर चे आयोजन करण्यात आलेले आहे.यावेळी ४० नागरिकांनी रक्तदान केले व ९७ नागरिकांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला.

सामान्य नागरिकांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच रस्ता रस्त्यावरील अपघातांचे प्रकार याविषयी माहिती देण्यात आली. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा राजू मेढे वर्धा मेघल अनासने सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री प्रतापसिंह राठोड विभाग नियंत्रक म रा मा प का वर्धा डॉ शिवली कलोडे बि टी ओ जिल्हा सामान्य रुग्णालय, देवानंद पाटील पोलीस निरीक्षक मोटर परिवहन विभाग, डॉ प्रीती परळकर जिल्हा नेत्र शल्य चिकित्सक तसेच उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथील मोटर वाहन निरीक्षक प्रफुल मेश्राम, संदीप मुखे, अजय चौधरी, साधना कावळे व सहायक मोटर वाहन निरीक्षक विशाल भगत, अक्षय मालवे, आदित्य ठोक, अमर पखान, राहुल ढोबळे व कर्मचारी वर्ग आणि वर्धा जिल्हातील सर्व ड्रायव्हिंग स्कूल चे संचालक उपस्थित होते.

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी १५ जानेवारी पर्यंत मुदतवाढ

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. ०८ जानेवारी**

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना अर्ज करण्यासाठी १५ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करुन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

### उभ्या ट्रकवर दुचाकी आदळल्याने चालकाचा मृत्यू

**वर्धा :** रस्त्याच्या मधात उभ्या ट्रकवर दुचाकी धडकल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला, तर त्याची पत्नी जखमी झाली, हा अपघात वर्धमनेरी चौकातील रस्त्यावर झाला,

याप्रकरणी तळेगाव पोलिसात ५ रोजी तक्रार दाखल करण्यात आली, सुनील अंबादास नवले (६५ रा. फत्तेपुर शिवणगाव जि. अमरावती)असेमृताचेनाव आहे, तर छाया नवले असे जखमीचे नाव आहे, छाया आणि सुनील नवले हे दोघेही ३ रोजी लाडक्या बहिणीचे पैसे पोस्टात आल्याने ते आणण्यासाठी एमएच २७ सीएम ४७२२ क्रमांकाच्या दुचाकीने पोस्टात गेले होते, पोस्टातून पैसे काढून आर्वी येथे जात असताना वर्धमनेरी बसस्थानकावर ३४ बीजी ४८६७ क्रमांकाचा ट्रक रस्त्याच्या मधात उभा होता, सुनीलला दुचाकी काढताना ट्रकचा मागील भाग लागल्याने दोघेही रस्त्यावर पडले आणि दुचाकी ट्रकच्या चाकात जात फसली, यात जखमी झाल्यानंतर सुनील व त्यांच्या पत्नीला तातडीने अमरावती येथील रुग्णलयात दाखल केले, तेव्हा सुनीलला मृत घोषित केले, तर पत्नी छाया ही गंभीर जखमी आहे, त्यांच्या तक्रारीवरुन ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## दीपचंद चौधरी विद्यालयात स्नेहसंमेलन व माजी विद्यार्थी मेळावा




**महासागर प्रतिनिधी**
**सेलू, दि. ०८ जानेवारी**

स्थानिक दीपचंद चौधरी विद्यालयाला ७५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने 'शाळेचा अमृत महोत्सव वर्षपूर्ती कार्यक्रम' साजरा करण्यात आला. या अनुषंगाने शाळेत स्नेहसंमेलनाचे आयोजन करून क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, वर्गसजावट, रांगोळी व पुष्परचना अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक रंगराव देशमुख होते उद्घाटक म्हणून श्रावण मकरंदे, नवलचंद चौधरी यांची विशेष उपस्थिती होती. तसेच माजी विद्यार्थी डॉ. प्रकाश खोडके, डॉ. ज्ञानेश्वर देवतारे, विनायक कामडी हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तर प्राचार्या सुहासिनी पोहाणे यांचेसह नवीन चौधरी, युवराज राठी, नारायणराव वांदिले, डॉ. मोहन भाटेरो, डॉ. जयंत मकरंदे, डॉ. चंद्रकांत जाधव, डॉ शिवराम काटकर, डॉ. विजया काटकर, शैलेंद्र दप्तरी, राजेंद्र मिश्रा, नरेंद्र सारस्वत व संचालक मंडळासह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन देविदास झाडे व डॉ. किरण वांदिले यांनी केले तर प्रा. डॉ. विवेक जगताप यांनी आभारप्रदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्या सुहासिनी पोहाणे यांनी आपल्या प्रास्ताविकातून शाळेची यशोगाथा मांडली. माजी विद्यार्थ्यांच्या 'स्नेहमिलन' या कार्यक्रमात माजी गुरुजनांचा सत्कार व त्यांच्याशी भेट, जुन्या मित्रांशी हितगुज, एकमेकांचा परिचय, शालेय आवारातील भटकंती, जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी खेळ, सजवलेल्या वर्ग व विविध दालनाला भेट, आपल्या स्मृती सदैव तरोताजा राहाव्यात यांसाठी 'एक बेंच, एक वृक्ष' अंतर्गत वृक्षारोपण, स्नेहभोजन, सेल्फी पॉईंटचा आस्वाद, मनोरंजन अशा नानारंगी बाबींचा यामध्ये समावेश होता.

प्रसिद्ध बासरीवादक अरविंद उपाध्ये यांचे शास्त्रीय बासरीवादन व शालेय विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक सादरीकरण आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले.कार्यक्रमाचे संचालन गार्गी गायधने व प्रा.डॉ. विवेक जगताप यांनी केले व आभार शिवम गोल्हर यांनी मानले. मेळाव्यात देश- विदेशात गेलेले काही माजी विद्यार्थ्यांनी देखील उपस्थिती लावली हे विशेष! स्नेहमिलन कार्यक्रमाच्या निमित्ताने बालपणीच्या मित्रांच्या भेटीगाठी होऊन जुन्या आठवणींना उजाळा मिळेल व मैत्रीचे नाते अधिकाधिक घट्ट होईल असा गोड आठवणींच्या वचनाने हा मेळावा बहारदार, रंगतदार आणि अविस्मरणीय राहिला. ज्या शाळेने आपल्याला भरभरून दिले त्या शाळेचे ऋणानुबंध जपण्याची व भावी पिढीलाही सोबत घेण्याची ही एक आनंदाची पर्वणी लाभली. शाळेप्रती एक जिव्हाळा म्हणून 'करू या ऋणांची परतफेड' हा उपक्रम सुरु करून गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांनी मदतीचा हात दिला. काहींनी रोख रकमेच्या देण्याची तर काहींनी वस्तू देण्याचे कबूल केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. कल्पना मकरंदे,जी बी खंडागळे, मंगेश वडुरकर, लक्ष्मिनारायण पिल्ले, देवीदास झाडे, व्हि एम चांदेकर, एच. जे. मुडे, प्रशांत चव्हाण, यांचेसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी माजी तथा शालेय विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

आजचा वाढदिवस
दै. महासागर
परिवारातर्फे शुभेच्छा


प्रभाकर झाडे


प्रशांत कलोडे


दिनेश देशपांडे


आशीष भोयर


गजानन दोनडकर


डॉ. राम बावनकर


विकास मंथनवार


आशीष पुरोहित


अनिल देशमुख

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपुरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

